International Recognized Double-Blind Peer Reviewed Multidisciplinary Research Journal
**Golden Research Thoughts**
ISSN 2231-5063 Impact Factor : 3.4052 (UIF)
Volume - 4 | Issue - 11 | May - 2015 Available online at www.isrj.org

# भारताचे परराष्ट्र धोरण आणि सार्क राष्ट्रे



**मारोती तुकाराम घंटेवाड**

**राज्यशास्त्र विभाग, वसुंधरा कला महाविद्यालय, सोलापूर.**

Short Profile :
Marothi Tukharam Ghantewad is Department of Political Science, Vasundhara Arts College, Solapur.




***सारांश :***

जागतिक पातळीवर सर्वच राष्ट्रे आपले राष्ट्रीय हितसंबंध आणि सुरक्षितेकरिता आपापल्या राष्ट्राचे धोरण उपलब्ध परिस्थितीनुसार व वस्तुनिष्ठ घटकांचा विचार करून ठरवित असताना दिसून येतात. याशिवाय राष्ट्रांचे हितसंबंध सुरक्षितता, सार्वभौम आणि आर्थिक विकास व राजकीय पकड अधिक मजबूत होणे शक्य होत नाही. याकरिता जगातील प्रत्येक राष्ट्रे आपले धोरण इतर राष्ट्रांशी आर्थिकदृष्ट्या मैत्रीपूर्ण ठरविताना दिसून येतात. या विचारसरणीचा वेग अलीकडील कालखंडात व्यापक प्रमाणात दिसून येत असला तरी अशा प्रकारचे धोरण प्राचीन ग्रीन कालखंडातील नगर राज्यांत कमी अधिक प्रमाणात ठरवित होते असे आपणांस दिसून येते. कालांतराने यात परिस्थितीनुसार बदल होत गेला.

**Article Indexed in :**

DOAJ Google Scholar DRJI
BASE EBSCO Open J-Gate

## प्रस्तावना :

आज विकासाचे धोरण राबवित असताना विकसित राष्ट्रे अविकसीत राष्ट्रांशी सहकार्य वातावरण निर्माण करणे त्यांच्या विकासाच्या दृष्टीकोनातून आवश्यक बनले आहे. त्यास भारत हा अपवाद राहू शकत नाही. या विचारसरणीचा वेग पहिल्या महायुध्दानंतर वाढला आणि दुसऱ्या महायुध्दानंतर जगातील बहुतांशी राष्ट्रे वसाहतवादाच्या नियंत्रणापासून मुक्त झाल्युळे या विचारप्रणालीने अधिक वेग घेतला असला तरी याच कालखंडात शितयुध्दास प्रारंभ झाला. या स्थितीवर मात करून भारत आणि भारताच्या शेजारील राष्ट्रांचा विकास कसा साधता येईल या दृष्टीकोनातून भारताने आपल्या हितसंबंधासाठी उपलब्ध असणाऱ्या साधन सामुग्रीचा आणि वस्तुनिष्ठ घटकांचा त्याचबरोबर शेजारील राष्ट्रांचा "सार्क" विकासासाठी सहकार्याचा विचार करून धोरण ठरविण्यास प्रारंभ केला. या प्राथमिक युगास Neharus Foreign Policy असे म्हणतात. अर्थात भारताच्या परराष्ट्र धोरणावर पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या विचारांचा प्रभाव होता आणि आजही आहे. त्याचबरोबर भारताने आपल्या राष्ट्राचे परराष्ट्र धोरण ठरवित असताना त्यावर इतर घटकांचाही प्रभाव पडताना दिसून येतो.

दुसऱ्या महायुध्दानंतर जागतिक राजकारणात जी तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली त्या पार्श्वभूमीवर भारताने आपला सर्वांगिण विकास व्हावा त्याचबरोबर शेजारील राष्ट्रांचाही विकास व्हावा या दृष्टीने आपले परराष्ट्र धोरण अधिक मजबूत करण्यासाठी "पंचशिल तत्वाचा" स्विकार करून आंतरराष्ट्रीय क्षेत्रात आपली मजबूत पकड निर्माण केली. परंतु प्रत्येक राष्ट्राची राष्ट्रहिताची संकल्पना काळानुसार बदलत असते. अगदी १९३६ ते १९४४ या कालखंडात जर्मन, इंग्लड आणि फ्रान्सचे हित दिसत होते. तसेच शितयुध्दाच्या वातावरणात म्हणजे १९४५ ते १९९० पर्यंत सोव्हीयत, रशिया व अमेरिकेला त्यांच्या राष्ट्रीय हिताच्या दृष्टीकोनातून ज्या गोष्टी महत्वाच्या वाटत होत्या त्या अलीकडे दिसत नाहीत. त्याचप्रमाणे स्वातंत्र्यप्राप्तीपासून ते १९८५ पर्यंत भारताला राष्ट्रहिताच्या दृष्टीकोनातून ज्या गोष्टी आवश्यक वाटत होत्या त्या प्रकर्षाने वर्तमानस्थितीत दिसून येत नाहीत.

जागतिक राजकारणाच्या समीकरणातील बदलते प्रवाह लक्षात घेता भारताने 'सार्क' राष्ट्रांच्या विकासाचा विचार करूनच आपल्या परराष्ट्र धोरणात काही अंशी प्रमाणात बदल करून विकसित राष्ट्रांचे आणि शेजारील राष्ट्रांसोबत आपले मैत्रीपूर्ण सहकार्याचे हितसंबंध मजबूत करण्यावर अधिक भर दिला आहे. अगदी भारताचे पहिले पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरूपासून ते नरेंद्र मोदीपर्यंत भारताने आपले परराष्ट्र धोरण ठरवित असताना शेजारील राष्ट्रांना आपल्या प्रत्येक कार्यप्रणालीत सामावून घेणे अधिक महत्वाचे वाटले म्हणून "सार्क संघटना" ७, ८ डिसेंबर १९८५ रोजी निर्माण झाली. या व्यासपीठावरून भारताने शेजारील राष्ट्रांसोबत संघटन व मैत्रीपूर्ण सहकार्य करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. भारताने-पाकीस्तान, बांग्लादेश, श्रीलंका, नेपाळ, भूटान, मालदीव आणि अफगाणिस्तान या राष्ट्रांबातीत सातत्याने मैत्रीपूर्ण सहकार्याचे धोरण स्विकारले आहे. सर्व "सार्क" सदस्य राष्ट्रात लोकशाही, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, व्यापार, उद्योग, विज्ञान, तंत्रज्ञान, आरोग्य इ. क्षेत्रात विकास झाल्याशिवाय भारतासमोर कोणत्याही प्रकारची समस्या उद्‌भवणार नाही म्हणून आपल्याबरोबर शेजारील राष्ट्रांचाही विकास करणे त्यासाठी लागणाऱ्या साधनसामुग्रीची मदत करणे, या क्षेत्रातील सातत्याने वाढत असणाऱ्या दहशतवादाचा सामूहीकपणे मुकाबला करून या क्षेत्रातील दहशतवादाचे समूळ उच्चाटन करणे तसेच या क्षेत्रात लोकशाहीच्या माध्यमातून शासन निर्माण करण्यासाठी भारताने आपले परराष्ट्र धोरण शेजारील राष्ट्रांसोबत सकारात्मक ठेवण्याचा सातत्याने प्रयत्न करीत आहे.

१९८५ नंतर भारत शेजारील राष्ट्रांसोबत अधिकच संबंध निर्माण करून अनेक प्रकारची मदत करून दक्षिण आशियाई क्षेत्रात जेष्ठ बंधूची भूमिका बजावताना दिसून येते. ७,८ डिसेंबर १९८५ रोजी बांग्लादेशाची राजधानी ढाका येथे सार्कची स्थापना होवून प्रथम शिखर परिषद भरविण्यात आली. यावेळी प्रथम पुढाकार घेणाऱ्या बांग्लादेशाला पूर्णपणे भारताने पाठींबा देवून सर्वाधिक आर्थिक मदतीचा हिस्सा ३७% उचलून सार्कच्या स्थापनेत मोठा हातभार लावला. दक्षिण आशियाई क्षेत्रातील सार्क राष्ट्रांमध्ये शांततेचे, सहकार्याचे आणि विकासाचे वातावरण निर्माण व्हावे यासाठी लोकशाही प्रस्थापित करण्याचा प्रयत्न सातत्याने भारताने पुढाकार घेवून केला आहे. भारताने पंचशिल तत्व, अलिप्तता, शांतता, निःशस्त्रीकरण, परस्पर मैत्रीपूर्ण सहकार्य, सार्क राष्ट्रांच्या सार्वभौमत्वाचा आदर, अंतर्गत कार्यात अहस्तक्षेप अशा तत्वांचा स्विकार करून

शेजारील राष्ट्रांना वेळोवेळी मदतीचा हात दिला आहे. जेंव्हा जेंव्हा नैसर्गिक संकटे आली, दहशतवादी कृत्यामुळे सार्क राष्ट्रात जिवित हानी व आर्थिक नुकसान झाले अशावेळी भारताने आपली जेष्ठ बंधूची भूमिका बजावून अधिकाधिक आर्थिक मदत करून तेथील विस्कळीत झालेले जनजीवन पुन्हा सुरळीत करण्याचा प्रयत्न करीत आला आहे. भारतात कोणत्याही पक्षाचे सरकार असो प्रत्येक पक्षाच्या पंतप्रधान, परराष्ट्र मंत्री, संरक्षण मंत्री, आरोग्य मंत्री, शिक्षण मंत्री, पर्यावरण मंत्री, क्रिडा मंत्री, अर्थमंत्री यांनी सार्क राष्ट्राच्या सहकार्याबद्दल व आपले शेजारील राष्ट्रांसोबतचे संबंध सुधारण्याबद्दल एक पाऊल पुढेच ठेवीत आला आहे. त्यामुळे नरेंद्र मोदी म्हणाले की, सार्क संघटनेमुळे आशिया खंडातील सार्क राष्ट्रांचा विकास होण्यास वेळ लागणार नाही. त्यामुळे सर्व सदस्य राष्ट्रांनी कोणतेही प्रश्न, समस्या, सामूहीकपणे सोडविणे आवश्यक आहे. नेहरूंनी आपल्या कालखंडात भारताच्या विकासरूपी कार्याचा व शांततेचा आंतरराष्ट्रीय क्षेत्रात तत्कालीन स्थितीत ठसाच उमटविला. पुढे लाल बहादूर शास्त्री यांनी भारत पाकिस्तान संबंध सुधारण्यावर अधिक भर दिला. इंदिरा गांधी यांनी सार्क संघटनेची स्थापना करण्यासाठी झिया-उल-रहिमान यांना पूर्णपणे पाठींबा देऊन त्यांच्या कार्याचे समर्थन केल्यामुळे सार्क संघटना उदयास आली. राजीव गांधींनी सर्वाधिक आर्थिक मदतीचा वाटा उचलून सार्क संघटना पुढे आणण्यासाठी पुढाकार घेतला. इंद्रकुमार गुजराल यांचे तर परराष्ट्र धोरण आंतरराष्ट्रीय क्षेत्रात गुजराल सिध्दांत म्हणूनच ओळखले जातात. अटल बिहारी वाजपेय यांनी सार्क देशात शांतता, सहकार्य, आर्थिक विकासाच्या बाबतीत अनेक महत्वाचे निर्णय सार्कच्या व्यासपीठावरून घेतलेले दिसतात. भारत पाकिस्तान संबंध सुधारण्यासाठी अटलबिहारी वाजपेय यांनी दिल्ली लाहोर बस सेवा सुरू केली. दहशतवादाचे या क्षेत्रातून उच्चाटन करण्याचे सार्क व्यासपीठावरून वेळोवेळी आवाहन करण्यात येत आहे. डॉ.मनमोहनसिंगांनी शेजारील राष्ट्रांना आर्थिक मदत करून लोकशाही निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. भारताच्या पुढाकाराने अफगाणिस्तानला सार्कचे ८वे सदस्य राष्ट्राचा दर्जा बहाल करून अस्थिर अफगाणिस्तान या राष्ट्रास स्थिर करून शांतता व सहकार्यरूपी लोकशाही शासन निर्माण करून आधुनिक अफगाणिस्तान बनविण्याची ताकद भारताच्या रूपयात असल्यामुळे अध्यक्ष हमीद करझाई सरकारला आर्थिक मदत देऊ करून अफगाणिस्तानच्या पुर्नविकासासाठी डॉ.मनमोहनसिंगांनी अधिकाधिक सहकार्य केले. सार्क राष्ट्राच्या व्यापारात सातत्याने वाढ व्हावी हे ध्येय भारताने कायम ठेवले आहे.

भारताने प्रथम पासूनच आंतरराष्ट्रीय संबंध आणि बदलती जागतिक परिस्थितीत लक्षात घेवून परराष्ट्र धोरणाचा स्विकार व विकास केला आहे. भारताच्या परराष्ट्र धोरणाचा मुख्य उद्देश शांतता, सहकार्य, विकास, सार्वभौमत्वाचा आदर करणे, अंतर्गत कार्यात अहस्तक्षेप, नि:शस्त्रीकरण हा आहे. भारताने स्वातंत्र्य प्राप्तीपासून दक्षिण आशियाई क्षेत्राला युध्दापासून दूर ठेवण्याचे धोरण स्विकारले आहे. हे क्षेत्र महाशक्तीशाली राष्ट्रांच्या हस्तक्षेपापासून अलिप्त राहिल्यास विकास होईल याकडे अधिक लक्ष दिले आहे. या क्षेत्रातील वादग्रस्त प्रश्न शांततेच्या आणि सहकार्याच्या माध्यमातून सोडविण्यासाठी भारत पुढाकार घेत आला आहे. भारताने शांततेच्या तत्वाचा स्विकार करून "तास्कंद करार" व "शिमला" करार घडवून आणला. हे करार शांततेचे प्रतीक मानले जातात. भारताने श्रीलंका आणि मालदीव मध्ये जी शांतीसेना पाठविली ते तेथील सरकारच्या विनंतीवरूनच. बांग्लादेशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यात श्रीमती इंदिरा गांधींनी माघे न राहता पुढाकार घेवून जी सहकार्याची भूमिका बजावली ती महत्वपूर्ण होती. भारताने हस्तक्षेप करून शेजारील राष्ट्रांना स्वातंत्र्य मिळवून देण्यात आणि शांतता निर्माण करण्यात जी भूमिका बजावली ती निरपेक्ष होती. भारताने आपले वर्चस्व इतर राष्ट्रांवर असावेत असा विचार आजपर्यंत केलेला दिसत नाही. उलट शेजारील राष्ट्रांचा विकास, सुरक्षा वाढविण्यावर अधिक भर दिला आहे.

भारताने सार्क राष्ट्रातील राजकीय वाद सोडविण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले आहेत. बांग्लादेशातील फरक्का प्रश्न, घुसखोरी, गंगा नदीच्या पाणी वाटपाचा प्रश्न, श्रीलंकेतील तामिळांचा प्रश्न, नेपाळमधील सुस्ता, तराई, कालापानी या गावाच्या सरहद्दीबाबतचा वाद मिटविला. भारताने सार्क राष्ट्रांशी एकनिष्ठपणे अनेक सवलती देवून या क्षेत्रात विकासाचा समतोल राखण्याचा प्रयत्न केला. तसेच या क्षेत्रात निर्माण झालेल्या समस्येवर उपाय शोधण्याचा प्रयत्न सार्कच्या माध्यमातून करीत आला आहे.

सार्कच्या दहाव्या शिखर परिषदेत भारताचे तत्कालीन परराष्ट्र मंत्री जशवंत सिंह यांनी नेपाळच्या ८०० दशलक्ष नेपाळी रूपयाचे मदत जाहीर केली. ती मदत नेपाळमधील शिक्षण व ग्रामीण विकासाकरिता खर्च केली जाईल असे स्पष्ट केले. पंतप्रधान अटल बिहारी वाजपेय यांनी सार्क व्यासपीठावरून "गरीबी हटाओ" चा नारा दिला. यासाठी भारताकडून १० कोटी अमेरिकन डॉलरची मदत भारत वगळता सार्क सदस्य राष्ट्रांच्या कार्यासाठी खर्च केली जाईल असे घोषित केले.

मालदीव मधील सत्ता परिवर्तनासाठी केलेली मदत अधिक महत्वाची आहे. त्यामुळे तेथे लोकशाही उदयास आली. भूटान मधील शिक्षण, जलसिंचन, रस्ते बांधणी, दूरसंचार, संरक्षण, पोलीस दल अशा अनेक क्षेत्रात भारताने अधिक सहकार्य केले आहे. त्यामुळे भूटानच्या विविध क्षेत्रात अनेक भारतातील नागरिक कार्यरत आहेत. म्हणूनच भूटानच्या सर्वच क्षेत्रात भारताच्या सहकार्याची छाप दिसून येते. सध्या भारताने बांग्लादेशाला भारताकडून मिळणाऱ्या कर्जात दुप्पटीने वाढ करून म्हणजे ६० कोटी डॉलरवरून १२० कोटी अमेरिकन डॉलर केले आहे. यावरून भारताची सार्क राष्ट्राच्या विकास कार्यात व शांतता प्रक्रियेत भूमिका किती महत्वाची व आवश्यक आहे हे वरील सहकार्यरूपी भूमिकेतून अधिकच स्पष्ट होते.

डॉ.मनमोहनसिंग सरकारने परराष्ट्र धोरण अधिकाधिक मजबूत करण्यावर भर दिल्याने जपान सरकारने महत्वाचा पुरस्कार देवून त्यांचा गौरव केला आहे. पुढे नरेंद्र मोदी पंतप्रधान पदाची शपथ घेतानाच सुरूवात केली की, परराष्ट्र संबंध सुधारण्यासाठी सर्व शेजारील राष्ट्रांच्या राष्ट्र प्रमुखांना बोलावून जगाला आश्चर्याचा धक्का दिला. तेवढेच करून ते थांबले नाही तर भारतासाठी आणि शेजारील राष्ट्राच्या विकासाकरिता "अच्छे दिन" आल्याचे जाहीर केले. आणि आपली छाप आंतरराष्ट्रीय क्षेत्रात निर्माण करण्यासाठी परदेश दौऱ्यास सुरूवात केली. ज्या देशात गेले त्या देशात सर्वाधिक सहकार्य आणि प्रेमाचा वर्षाव झाला. भूटान, नेपाळ या देशांना यशस्वी भेटी दिल्या. ब्रिक्स या शिखर परिषदेत भाग घेवून महत्वाची भूमिका मांडली. युनोच्या आमसभेतील नरेंद्र मोदीच्या भाषणाने जगातील जनता प्रभावित झाली. चीन, अमेरिका दौरे करून आपली मैत्री वाढविण्यावर भर दिला. चीनचे राष्ट्राध्यक्ष जिनपिंग आणि अमेरिकन राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा भारताचा दौरा करून भारत-चीन, भारत-अमेरिका या राष्ट्रांनी अनेक महत्वाचे निर्णय घेतले. जपानला मैत्रीपूर्ण भेट देवून भारत जपान संबंध पुन्हा मजबूत करण्यावर नरेंद्र मोदींनी भर दिला. ऑस्ट्रेलिया दौरा करून ऑस्ट्रेलियन नागरिकांची व तेथील पंतप्रधानाची मने जिंकली. त्यामुळे ऑस्ट्रेलिया पंतप्रधान भारत भेटीवर येवून अणुशक्ती उत्पादनाच्या बाबतीत महत्वाचा करार केला. पुढे सार्क परिषदेच्या व्यासपीठावरून शांतता, सहकार्य आणि विकासावर भर देत परस्पर सहकार्याचा नारा दिला. स्वतः मोदींनी नवाझ शरीफ यांना मैत्रीचा हात दिला. अलीकडे नेपाळमधील भूकंपामुळे तेथील जनजीवन विस्कळीत झाले आहे. अशावेळी भारताने पूर्ण पणाने सर्व दृष्टीकोनातून मदतीचा सर्वाधिक ओघ पाठविला आहे. यावरून पंतप्रधान नरेंद्र मोदींनी परराष्ट्र धोरण अधिक मजबूत करण्यावर भर दिला आहे. परंतु त्यांच्या धोरणापुढे अनेक आव्हाने व समस्या आहेत. आज दक्षिण आशियाईतील भस्मासुरा सारखा पसरत असणारा दहशतवाद, तालिबानी संघटना याचा सामना सार्क राष्ट्रांना करावा लागत आहे. या क्षेत्रात यापूर्वी कधीही आताच्या इतके सार्क राष्ट्रे राजकीयदृष्ट्या अस्थिर नव्हते. एकीकडे पाकिस्तान घुमसतो, बांग्लादेशात तालिबानी वृत्ती सत्ताधारी वर्गाला आव्हान देण्यासाठी पुढे सरसावले आहेत. अफगाणिस्तानातील मानवी जनजीवन असुरक्षित बनविण्याचे कार्य तालिबानी संघटना करीत आहेत. भारत-पाक मध्ये काश्मिर प्रश्न चिघळत आहे या सर्व बाबीवर मात करण्यासाठी सार्क राष्ट्रांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विश्वासात घेवून आणि इतर राष्ट्राचे आपल्या बाबतीतले मनसुबे ओळखून तशी पाऊले उचलणे अपेक्षित आहे. तसे झाल्यास नरेंद्र मोदी परराष्ट्र धोरणात यशस्वी होतील. आणि दक्षिण आशियाई राष्ट्रांचा सामूहीक विकास होवून हे क्षेत्र विकास आणि शांततेचे क्षेत्र म्हणून जागतिक स्तरावर ओळखले जाईल.

## संदर्भ सूची :-

१) जवाहरलाल नेहरू, इंडियन फॉरेन पॉलिसी, सलेक्ट स्पिच, सप्टेंबर १९४६ ते एप्रिल १९६१
२) भारत सरकार विदेश मंत्रालय रिपोर्ट, १९७०-१९७७, नई दिल्ली
३) भारत सरकार रक्षा मंत्रालय रिपोर्ट, १९९५-१९९६, नई दिल्ली
४) एम.एस. राजन- इंडियन फॉरेन पॉलिसी ॲन्ड रिलेशन, नई दिल्ली
५) आर.एस.यादव- भारत की विदेश निती- एक विश्लेषण, किताब महल पब्लिकेशन, अलाहाबाद, २००२.
६) रूमकी बसु- संयुक्त राष्ट्र संघ- सिध्दांत एवं व्यवहार, जवाहर पब्लिकेशन, नई दिल्ली, २०११
७) व्ही.एन. खन्ना- आंतरराष्ट्रीय संबंध, विकास पब्लिकेशन नोएडा, दिल्ली, २००७
८) विवेक एस.राज- भारतीय विदेश निती, सिव्हील सर्विस टाईम, मैदानगी रोड, नई दिल्ली, २०१२
९) ए.के. मिश्रा- दक्षिण आशिया एवं भारत का विकास, प्रिज्म बुक्स, जयपूर, २०१२

१०) बी.पी.दत्त- स्वतंत्र भारत की विदेश निती, नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, नई दिल्ली, २०११
११) निरज सिंह- नेहरू-पटेल अॅग्रीमेंट विदीन डिफरन्स, सलेक्टेड डॉक्युमेंट, १९३५-१९५०, नॅशनल बुक ट्रस्ट, नई दिल्ली २०१०
१२) सलाम यादव- बांग्लादेश के स्वतंत्र संग्राम मे भारत का योगदान, नॅशनल बुक ट्रस्ट, नई दिल्ली, २००९
१३) सी.पी. श्रीवास्तव- लाल बहादूर शास्त्री, राजकारणातील मर्यादा पुरूषोत्तम, रोहन प्रकाशन, पुणे २०१३